# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २६.०७.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) राणाप्रतापनगर पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक, एकुण ०९ गुन्हे उघडकीस.**

पोलीस ठाणे राणाप्रतापनगर हद्दीत, प्लॉट नं. १९३३, तिसरा बस स्टॉप, गोपाल नगर, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. वर्षा रमन भोयर, वय ४२ वर्षे यांचे तळमजल्यावर अंजली स्टील शॉप नावाचे दुकान आहे. दिनांक २३.०७.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक २४.०७.२०२६ चे ०७.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी त्यांचे दुकानाचे शटरला लॉक लावुन, त्या त्यांचे पहील्या माळ्यावरील घरी गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटर उचकावुन, आंत प्रवेश करून, दुकानमधील रोख १०,०००/—रू. तसेच, पितळी, कास्याचे वेगवेगळे भांडे असा एकुण किंमती ४९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान राणाप्रतापनगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी आर्यन भगवान नंदेश्वर, वय १९ वर्षे, रा. गेडाम ले—आऊट, संतोष डेकोरेशन जवळ, वानाडोंगरी, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्याने त्याचे ईतर ०३ विधीसंघर्षग्रस्त बालक साथीदारांसह संगणमतोन चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीला अधिक सखोल विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे राणाप्रताप नगर हद्दीत ईतर ०३ वाहन चोरीचे गुन्हे तसेच, पो. ठाणे एमआयडीसी हद्दीत ०२ ठिकाणी घरफोडी व ०२ ठिकाणी वाहनचोरी तसेच, पो.ठाणे बजाजनगर हद्दीतुन ०१ मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील मुद्देमाल, रोख, वेगवेगळे मोबाईल तसेच, अॅक्टीवा क्र. एमएच ३० ए.यु. ६१९३, होंडा डिलक्स क्र. एम.एच. ३४ बि.एक्स ३९४६, स्प्लेंडर क्र. एमएच ४९ क्यु ३२३०, ग्रे रंगाची स्प्लेंडर प्लस एमएच. ३५ बिई ०२४२ व अॅक्टीवा मोपेड क्र. एमएच ४० ए.वाय ३५१० असा एकुण ३,१८,१००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकांकडुन एकुण ०९ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. पंकज बोडसे, पोनि. प्रशांत गिते, पोउपनि. सतीष भोले, पोहवा. विशेषकुमार गुढेवार, एकनाथ पाटील, दिनेश भोगे, पोअं. अजय धुर्वे, आनंद काबलीया, अलेक्झॅडर डिक्रुज व सचिन तिवारी यांनी केली.



**२) हुडकेश्वर पोलीसांची कामगीरी :— मकोका अंतर्गत फरार आरोपीस अटक.**

दिनांक २५.०६.२०२६ रोजी, हुडकेश्वर पोलीसांना गुप्त माहीती मिळाली की, पोलीस ठाणे शांतीनगर अंतर्गत गुन्हा क्र. २१८/२०२५ मधील मकोका अंतर्गत कारवाईतील फरार आरोपी तिरूपती भोगे हा संभाजीनगर—नरसाळा परीसरात फिरत आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून हुडकेश्वर पोलीसांनी परीसरात शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा ईसम संशयीतरित्या दिसुन आला. त्यास सापळा रचुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव तिरूपती बाबुराव भोगे, वय ४१ वर्षे, रा. साईबाबा नगर चौक, शांतीनगर, नागपुर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्याचेवर मा. वरीष्ठांचे आदेशाने पोलीस ठाणे शांतीनगर येथे दाखल अप क्र. २१८/२०२५ मध्ये मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येवुन, तो मागील ०८ महीन्यांपासुन त्या गुन्ह्यात फरार असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव शांतीनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्रीमती अनामिका मिर्झापुरे, सपोनि. पापीन रामटेके, व त्यांचे तपास पथकाने केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे पाचपावली :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २६.०७.२०२६ चे ०८.३० वा. ते ०९.३० वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, ईटाभट्टी चौक जवळ, बंदे नवाज नगर, नागपूर येथे गोवंशीय जनावरांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन शेख नसिम शेख हकीम कुरैशी याचे घरी पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे ०९ गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले दिसुन आले.

नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, जनावरे हे घरमालक पाहीजे आरोपींची असल्याचे समजले. आरोपीने गोवंशीय जनावरांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ०९ गोवंशीय जनावरे व ईतर साहित्य असा एकुण किंमती २,३०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे पाचपावली येथे मपोउपनि. नुतन जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ५, ५(ब)(क), ९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(च)(छ) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १५.०७.२०२६ चे ०२.०० वा. ते दि. २३.०७.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, हजारी पहाड, वायुसेना, सुभाष किराणा स्टोअर्स येथे राहणारे फिर्यादी साकेत सुभाष खडगी, वय २० वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन परिवारासह राजस्थान येथे फिरण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, देवघरातील आलमारीचे लॉकरमधील रोख २,००,०००/—रू. चोरून नेले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे मपोउपनि. सुप्रीया पुंडके ९५११८०९९७९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे नविन कामठी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २५.०७.२०२६ चे २१.४५ वा. चे सुमाराय, नविन कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, अब्दुलशाह दर्गाह जवळ, सुरज नावाचा ईसम शस्त्र बाळगुन फिरत आहे. अशा माहितीवरुन घटनास्थळी गेले असता, एक ईसम पोलीसांना पाहुन पळाल्याने त्याचा पाठलाग करून, त्याला ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुरज भैय्यालाल केराम, वय ३६ वर्षे रा. चित्तरंजन नगर, नविन कामठी, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक धारदार लोखंडी चाकु मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकू किंमती ४००/—रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने, व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोअं. सोनु मेश्राम यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. अक्षय झगडे ७०३८८४९०१४ आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे सोनेगांव</u> :—** दिनांक २३.०७.२०२६ चे २२.०० वा. सुमारास, पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत जयप्रकाश नगर, ओसिएम बिल्डींग क्र. २ येथे काम करणारे व तेथेच हल्ली मुक्कामी राहणारे ईसम नामे ओमप्रकाश महेंद्र मिस्त्री, वय ५२ वर्षे, रा. कन्हैसी, तह. सिखौंदी, जि. लकीसराय (बिहार) हे तिसऱ्या माळ्यावर फर्निचरचे काम करून, तेथेच झोपेले होते. दि. २४.०७.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, बिल्डींगचे खाली पार्कींगमध्ये जखमी अवस्थेत गार्डला दिसले. त्यांना विचारपुस केली असता, त्यांनी खाली पडल्याचे सांगीतले होते. जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल ट्रॉमा सेंटर येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २५.०७.२०२६ चे २३.१५ वा. डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सोनेगांव येथे पोउपनि. संजय आठवले यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**